जाहीर नोटीस

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग व त्यांचे नियंत्रणाखाली येणा-या सर्व तालुका न्यायालयांच्या कार्यालयीन वापराकरीता सन २०२६-२०२७ या वर्षातील मंजूर झालेली स्टेशनरी शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार, कोल्हापूर येथून आणावयाची आहे. सदर स्टेशनरीचे अंदाजे सुमारे ८० ते १०० कागदांच्या रिमचे गठ्ठे (५ ते १० रिमचा एक गठ्ठा) शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार, कोल्हापूर येथून घेवून ते जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयापर्यंत पोहोच करणेसाठी खाजगी वाहन भाडयाने घ्यावयाचे आहे. त्याकरीता वर नमुद वहातुकीच्या खर्चाची दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नावे असावे. सदर लखोटयावर **"वहातुक खर्चाचे दरपत्रक "** असे नमूद असावे.

२) दरपत्रक सादर करणा-या वहातुक सेवा पुरवठादार यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी वाहन परवाना, पॅनकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) वर नमुद वहातुकीचे दरम्यान येणारा टोल किंवा तत्तसंबंधीचा अन्य खर्च संबंधीत वहातुक सेवा पुरवठादार यांनी सोसावयाचा आहे.

५) वहातुकी दरम्यान वस्तूंचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी संबंधीत वहातुक सेवा पुरवठादार यांनी घ्यावयाची आहे.

६) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

७) जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी ३ वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर, अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग-ओरोस यांचा राहील.

तरी, इच्छुक वहातुक सेवा पुरवठादार यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि.१५/०४/२०२६** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय , सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

06/04/2026

दिनांकः- ०६/०४/२०२६

सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा./ २५१ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांकः– ०६/०४/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर–

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता